# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २३/१०/२०२४

# प्रेसनोट

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिनांक १०.११.१२ व दिनांक १६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ध्वनीप्रदुषण नियम २००० मधील नियम ७ नुसार महापालिका क्षेत्रात ध्वनीप्रदुषण नियमांच्या उल्लंघनाबाबत तक्रारी संदर्भात तसेच मोठे सार्वजनिक सण, उत्सवांच्यावेळी रस्त्यावर, पदपथावर उभारण्यात येणा-या तात्पुरत्या मंडपासंदर्भात प्राप्त परवानगी पत्रातील अटींच्या उल्लंघनाबाबत उचित कार्यवाही होण्यासाठी खालीलप्रमाणे महापालिकेच्या प्रभाग समिती स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | अधिकारी/पदाधिकारी | समितीतील पद | प्रभाग समिती | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | संबधित सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी | अध्यक्ष | १ | ०२५१-२७२०१३९ |
| | | | २ | ०२५१-२७२१००८ |
| | | | ३ | ०२५१-२७२०१९३ |
| | | | ४ | ०२५१-२७२१०२७ |
| २ | संबधित प्रभागातील पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक. | सदस्य | - | - |
| ३ | संबधित प्रभागातील वाहतुक निरीक्षक. | सदस्य | - | - |
| ४ | संबधित प्रभागातील कनिष्ठ अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) | सदस्य | - | - |

त्या अनुषंगाने शहरातील नागरीकांना सूचित करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवानगी/अनधिकृत मंडप/स्टेज व तत्सम रचना उभारल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित सहायक आयुक्त् तथा अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. १ ते ४, यांचेकडे वरील नमुद केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर आपली तक्रारीची नोंद करावी.

तसेच यापुढे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मोठे सार्वजनिक सण, उत्सवांच्यावेळी रस्त्यावर, पदपथावर विनापरवानगी/अनधिकृत मंडप/स्टेज व तत्सम रचना उभारण्यात येऊ नये. विनापरवानगी/अनधिकृत मंडप/स्टेज व तत्सम रचना उभारल्यास संबंधिताविरुध्द जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिनांक १०.११,१२ व दिनांक १६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची शहरातील नागरीकांनी नोंद घ्यावी.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.